# <u>स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे काश्मिरींचा लोकशाहीवरील विश्वास अधोरेखित</u>

जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशातील जिल्हा विकास परिषदांच्या निवडणुका कोणी जिंकल्या, यापेक्षाही गेली गेल्या वर्षापासुन थांबलेली लोकशाही प्रक्रिया पुन्हा सुरु झाली, ही अतिशय स्वागतार्ह घडामोड आहे. या निवडणुकांवर बहिष्कार टाकायचा, की त्या लढवायच्या, याची चर्चा काश्मीरमध्ये अनेक दशके सत्ता उपभोगलेल्या नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी यांनी केली. मात्र, डॉ. फारुक अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली सात काश्मिरी पक्षांनी आघाडी करून या निवडणुका लढविल्या. या पक्षांनी लोकशाही प्रक्रियेवर बहिष्कार न घालता तीत सहभाग नोंदविल्यानेच या निवडणुकांना खरा अर्थ प्राप्त झाला

## <u>मतदारांचा लोकशाही प्रक्रियेत भाग</u>

जिल्हा विकास परिषदांच्या (डीडीसी) शांततामय आणि यशस्वी निवडणुकांच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरच्या मतदारांनी लोकशाहीवरील विश्वास दृढ असल्याचे दाखवून दिले. तत्पूर्वी दहशतवादी, अराजकवादी संस्था, संघटनांनी निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. पण, स्थानिक जनतेने त्याला धुडकावून लावले व लोकशाही प्रक्रियेत भाग घेतला. परिणामी, मतदारांनी मतदान कोणालाही करो, कोणताही पक्ष छोटा वा मोठा ठरो. पण, अंतिमतः लोकशाहीचाच विजय झाल्याचे यावरून स्पष्ट होते. भारतीय लोकशाही प्रणालीच्या दृष्टीने जम्मू-काश्मीरसारख्या राज्यातील मतदारांनी निवडणुकांत सहभाग घेणे ही नक्कीच आश्वासक बाब आहे. कारण, गेली साधारण तीन दशके जम्मू-काश्मीरमधील वातावरण अस्थिर असून, ही अस्थिरता संपविण्यासाठी व

प्रदेशाला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ५ ऑगस्ट, २०१९ रोजी भारतीय संसदेने 'कलम ३७०' व 'कलम ३५ अ' रद्द केले. तेव्हापासून जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती सामान्य करण्यासाठी केंद्र सरकार व प्रदेशातील शासन-प्रशासनाच्या वतीने अनेकानेक प्रयत्न केले गेले. आताच्या डीडीसी निवडणुकांतून त्या प्रयत्नांचे सुपरिणाम दिसून आले आणि जम्मू-काश्मीरमधील जनता कोणत्याही भूलथापांना, बळी पडणारी नाही, हेही सर्वांसमोर आले.

**निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन**

डीडीसी निवडणुकांचे वैशिष्ट्य म्हणजे फारुख अब्दुल्ला यांचा नॅशनल कॉन्फरन्स, मेहबुबा मुफ्ती यांचा पीडीपीसह सात पक्षांनी एकत्र येऊन गुपकार आघाडी स्थापन केली होती. त्यामुळे निवडणुकीत भाजप, सात पक्षांची गुपकार आघाडी, काँग्रेस आणि अपना पार्टी असा चौरंगी सामना झाला. डीडीसी निवडणुकांआधी गुपकार आघाडीतील पक्षांनी उमेदवारच देणार नाही, असे म्हटले होते. म्हणजे दहशतवादी, अराजकवाद्यांनी मतदारांना निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले, तर गुपकार आघाडीतील पक्षांनी निवडणुकाच न लढविण्याची घोषणा केली होती. पीडीपी प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी तर जम्मू-काश्मीरचा झेंडा बहाल केल्याशिवाय भारताचा झेंडा हाती घेणार नाही, इतकी टोकाची भाषाही वापरली होती. मात्र, अखेरीस त्यांनीही निवडणुका लढवल्याच, त्याला कारण जम्मू-काश्मीरच्या राजकीय अवकाशातून आपण संपून जाऊ, ही भीती. निवडणुकांवर बहिष्कार घातला, निवडणुका लढवल्याच नाही, तर जनता आपल्याला विस्मृतीत ढकलेल आणि पुन्हा कधीही आपण

प्रदेशातील राजकारणात परतू शकत नाही, याची जाणीव गुपकार आघाडीतील पक्षांना झाली, तसेच याचा थेट फटका आपल्या अर्थपूर्ण गतिविधींना बसू शकतो, हेदेखील त्यांना कळून चुकले. तसे होऊ नये व आपण जनतेपासून दुरावू नये म्हणून प्राप्त परिस्थितीत निवडणुका लढविण्याचे त्यांनी ठरविले.

**<u>पूर्वीपेक्षा अधिक संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी</u>**

काश्मिर खोर्यात सर्वच जिल्हयांतील मतांची टक्केवारी पाहता मतदार मोठ्या संख्येने घराबाहेर पडल्याचे दिसते .२०१९ सालच्या लोकसभा आणि २०१८ सालच्या पंचायत निवडणुकांपेक्षाही अनेक ठिकाणी मतांची टक्केवारी वाढल्याचे दिसते. उदा. २०१८ सालच्या पंचायत निवडणुकीत श्रीनगरला १४.५० टक्के, २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत ७.९ टक्के मतदान झाले, तर आता सुमारे ३५.३ टक्के. अवंतीपोरामध्ये २०१८ साली ०.४ टक्के व २०१९ साली तीन टक्के आणि आता ९.९ टक्के मतदान झाले. अनंतनागमध्ये २०१८ साली ९.३ टक्के व २०१९ साली १३.८ टक्के आणि आता २४.९ टक्के मतदान झाले, म्हणजेच मतदार पूर्वीपेक्षा अधिक उत्साहाने व संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी झाला आणि ही बाब जम्मू-काश्मीरमध्ये लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी सर्वात महत्त्वाची म्हटली पाहिजे.

डीडीसी निवडणुकांत भाजप व अपक्षांच्या विजयाने जम्मू-काश्मीरच्या मतदाराला परिवर्तन हवे असल्याचे दिसते. तसेच आगामी काळात इथे विधानसभेच्या निवडणुका घेण्याचा मार्गही खुला झाल्याचे स्पष्ट होते. कारण एकदा का प्रदेशात लोकमान्य सरकार आले की, इथले जनजीवन

अजुन जास्त वेगाने पूर्वपदावर येऊ शकते.

**<u>पाकिस्तानला झटका</u>**

भारतात जम्मू-काश्मीरमध्ये डीडीसी निवडणुका होत असताना जम्मू-काश्मीरला आपलेसे करण्याचे दिवास्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानला इस्लामी देशांनी समर्थन द्यावे, असे वाटले. पण, जगातील अन्य देशांनी तर पाकिस्तानचे समर्थन केलेले नाहीच; पण बहुतांश इस्लामी देशांनीदेखील पाकिस्तानच्या जम्मू-काश्मीरवरील रडगाण्याकडे लक्षही दिलेले नाही. सौदी अरेबियानेदेखील पाकिस्तानला या मुद्द्यावरून झटका दिला. दरवेळी कोणापुढे तरी वाडगा घेऊन उभ्या राहणाऱ्यां पाकिस्तानला फ़ारसे महत्व मिळाले नाही. डीडीसी निवडणुकांच्या माध्यमातून इथल्या जनतेलाही भारतीय लोकशाही व्यवस्थेअंतर्गतच राहायचे आहे, हे स्पष्ट होते. सरकारने जम्मू-काश्मीरमधील 'कलम ३७०' आणि '३५ ए' हद्दपार केले आणि जम्मू-काश्मीर आणि लडाख, असे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश भारतीय नकाशावर आले. पाकिस्तानच्या बाजुने असलेल्या काश्मीरमधील फुटीरतावाद्यांसह अब्दुल्ला-मुफ्तींच्या पक्षांनीही या निर्णयाचा कडाडून विरोध केला.मानवाधिकार, लोकशाहीच्या नावाखाली फुटीरतावाद्यांनी सरकारच्या आंतरराष्ट्रीय बदनामीचा पुरेपूर कट रचला. पाकिस्तान, जिथे लोकशाहीचा लवशेषही नाही, त्यांनीही 'लोकशाहीची हत्या'च्या नावाखाली आटापिटा करत यथेच्छ कांगावा केला. पाकिस्तानला साथ मिळाली चीनची. ज्या चीनमध्ये रातोरात सरकारविरोधी 'ब्र' काढणाऱ्यांनाही गायब केले जाते, त्या चीनने भारतातील लोकशाहीवर चिंता व्यक्त करावी, यासारखे हास्यास्पद ते काय?

**<u>फुटीरतावादी,भारतविरोधी ताकदींना चपराक</u>**

पाकिस्तानने खलिस्तानी संघटनांना सहकार्य करताना सांगितले होते की, या संघटनांनी पंजाबमध्ये 'हिजबुल मुजाहिद्दीन', 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'लष्कर-ए-तोयबा' यांच्यासाठी जमीन तयार करावी. 'काश्मीर-खलिस्तान

रेफरेंडम फ्रंट'ने वेगळ्या काश्मीरचे आणि खलिस्तानचे स्वप्न २०२० साली पूर्ण करण्याचे ठरवले होते. २०२० संपत आले आहे, पण, त्यांची ही इच्छा पूर्ण झाली नाही.

शरीर अक्षरश: गोठविणारी काश्मीरमधील कडाक्याची थंडी. पण, या बर्फाळ वातावरणातही अगदी शिस्तीत रांगा लावून, 'कोविड'च्या सर्व नियमावलीचे पालन करून, काश्मिरी जनतेने मतदानाचा मूलभूत हक्क बजावला. काश्मीरच्या आजवरच्या घटनाक्रमात तिला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे लक्षात घ्यायला हवे आणि त्यासाठी सर्वप्रथम काश्मीरच्या जनतेचे अभिनंदनच करायला हवे. 'कलम ३७०' हटविल्यानंतर प्रथमच जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकांमुळे काश्मिरींचा लोकशाहीवरील विश्वास अधोरेखित तर झालाच; पण फुटीरतावादी आणि भारतविरोधी ताकदींनाही एक सणसणीत चपराक बसली आहे.

जम्मू-काश्मीरची जनता १९८४ पासुन कायम दहशतीच्या छायेखालीच राहिली. भ्रष्ट प्रशासकीय व्यवस्थेमुळे त्यांचा 'सरकार' नामक व्यवस्थेवरचा विश्वासच विरून गेला होता. त्यामुळे 'लोकशाही', 'मतदान' या संविधानिक व्यवस्थांचे गांभीर्यच तिथे बर्फासारखे गोठले होते. परंतु, आता स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांच्या निमित्ताने लोकशाहीवरचा काश्मिरी जनतेचा हा विश्वास पुनश्च वृद्धिंगत होताना दिसतो.

फारुख अब्दुल्लानी, चीनने काश्मीरला ताब्यात घेण्याची देशद्रोही भाषाही केली होती.जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी निकाल लागल्यानंतर हाती घेतलेल्या ५४ मोठ्या प्रकल्पांपैकी २० पुरे झाले असल्याचे म्हटले आहे. उरलेले ३४ पूर्ण करण्यासाठी सर्वांनी सहकार्य दिले पाहिजे. पंतप्रधानांनी जम्मू-काश्मीरमध्ये दोन एम्स, पाच वैद्यकीय

महाविद्यालये, एनआयटी, आयआयटी, आयआयएम असे सारे उभारण्याचा शब्द दिला आहे. हे सारे व इतर विकास जमिनीवर दिसू लागला, तर सामान्य काश्मिरी नागरिकाला गुपकर आघाडीचा जाहीरनामा भविष्यात कालबाह्य वाटू शकेल. तसे होणे हेच जम्मू-काश्मीर आणि देशाच्याही हिताचे आहे.